# १९४७ नंतर भारतीय राजकारणाचे बदललेले स्वरूप आणि १९८० नंतरची हिंदूत्ववादी लाट

प्रा. डॉ. अंबादास नरहरी बिराजदार
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र).

## प्रस्तावना

१९४७ ते १९८० पर्यंतच्या भारतीय राजकरणांचे स्वरूप हे कॉंग्रेस वर्चस्वाच्या राजकारणाचे होते. या काळातील भारतीय राजकारणात हिंदुत्ववादी राजकारणाचे अस्तीत्व आणि विशेष स्वरूपाचे किंवा लक्षणीय नव्हते. हिंदुत्ववादी विचारांचे राजकीय प्रतिनिधीत्व जनसंघ करीत होता. परंतु जनसंघ शहरी उच्चवर्णीय समाजापुरताच मर्यादित राहीला होता. स्वा. सावरकरांच्या हिंदुत्ववादी राजकारणाच्या आणि संघीय राजकीय कार्यक्रमाच्या सिमारेषा स्पष्ट झालेल्या होत्या. स्वातंत्र्यपुर्व काळातील स्वा. सावरकरांच्या हिंदुमहासभा १९३७ नंतर कांही प्रमाणात सक्रिय झाली. परंतु भारतीय जनमानसाने हिंदुमहासभा आणि तिच्या राजकारणाला मनापासुन स्वीकारले नाही. हिंदुमहासभा आणि संघ यांची वैचारीक भूमिका आणि स्वात्रत्र्यपुर्व काळातील स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे नकारात्मक राजकारण हे त्यांच्या स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारणाला मारक ठरले हे स्पष्ट आहे.



## कॉंग्रेस वर्चस्वाचा कालखंड:-

नेहरू युगातील कॉंग्रेसचे स्वरूप सार्वमतसदृश्य होते. नेहरू युगांत नेहरूंचे नेतृत्व सर्वमान्य होते. नेहरूंनी कॉंग्रेसला व्यापक वैचारीक बैठक पुरविली आणि भारतीय समाजाला अखिल भारतीय समाजाचे एकात्म स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. स्व. इंदीरा गांधीनी पण नेहरुच्या राजकीय चौकटीत राजकारण केले. परंतु इंदीरा गांधीच्या काळातील राजकारणाला गतिमान करणारे प्रवाह बदललेले होते. प्रादेशिक आणि जातीच्या आधारावर ठिकठिकाणी राजकीय संघटन होऊ लागले होते. या बाबी इंदीरा गांधीनी लक्षात घेऊन सार्वमत सदृश्य राजकारणासाठी अधिक जहाल, आक्रमक आणि आकर्षक मुद्दा पुढे आणला. राजकारण व राज्ययंत्रणा गोरगरीब व पददलीतासाठी राबवायची की समाजामधील विशिष्ठ वर्गासाठी राबवावयाची. त्यांनी आपल्या आर्थिक धोरणाला समाजवादी स्वरूप देऊन बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानीकांचे तनखे रद्द करणे असे निर्णय घेतले. गरीबी हटाव हे त्यांच्या राजकारणचे घोषणात्मक स्परूप होते. प्रादेशिक स्थानिक नेतृत्वाचे व संस्थांचे महत्व कमी करून सार्वमत सदृश्य राजकारणाला अधिक महत्व दिले गेले.

## इंदीरा गांधीचे राजकारण अधिक व्यक्तीकेंद्री ठरले:-

स्व. इंदीरा गांधींनी १९७५ मध्ये आणिबाणी घोषीत केली. आणीबाणीच्या कालखंडात विरोधी राजकीय पक्षाच्या राजकारणाचा पोत बदलला. आणीबाणी मध्ये विविध विरोधी राजकीय पक्षांच्या नेत्यांची झालेली धरपकड आणि त्यांची स्थानबध्दता या कारणामुळे हुकूमशाही की लोकशाही अशा प्रश्नाभोवती राजकारण फिरत राहीले. आणिबाणी नंतर झालेल्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेस पराभूत झाली. स्व. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली घडून आलेले विरोधी पक्षाचे गठण **जनता पक्ष** म्हणून नावारूपास आले.

१९७७-१९८० हा अडीच वर्षाचा जनता पक्षाचा कार्यकाळ. व्दिसदस्यत्वाच्या प्रश्नावरून जनता पक्ष फुटला. पुर्वाश्रमीचा जनसंघ हा नव्या रूपात १९८० मध्ये भारतीय जनता पक्ष या नावाने उदयास आला.

१९९० नंतर काँग्रेसला उतरती कळा लागली. निवडणुकीत वारंवार होणारे पराभव आणि पडणारी मते, काँग्रेसला उतरती कळा लागण्याचे एक कारण आहे. १९७७ पासुन झालेल्या ९ निवडणुकापैकी ५ वेळा काँग्रेस पराभूत झाली. एकवेळ १९९१ साली कशीबशी सत्तेवर आली. ४० टक्क्यावरून अधिक मते मिळवणारी काँग्रेस आज २५ टक्क्यावर आली. २००४ मध्ये २७ टक्के मते आणि १४५ जागांसह काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला. काँग्रेसची पडझड व्यापक प्रमाणावर आहे. १९४७-१९६७ या काळात काँग्रेसची जी जडणघडण होत होती आणि ज्या सार्वमतसदृश्यतेच्या चौकटीत काँग्रेसचे राजकारण घडत होते. तिची पडझड काँग्रेसच्या अपयशाचे कारण आहे. एक अखिल भारतीय समाज असणे, तो असल्यासारखा वाटणे, त्याचे प्रतिनिधीत्व एकाच पक्षाने करणे आणि सार्वमत सदृश्य राजकारणव्दारा निवडणुकीत यश मिळवणे या गोष्टींना १९६७ नंतर धक्का बसला. काँग्रेसचे राजकारण इंदीरा गांधीच्या मृत्युनंतर प्रभावहीन ठरले.

### धर्मनिरपेक्ष विचारांची पिछेहाट:-

भारतीय संविधान कर्त्यानी भारत हा एक धर्म निरपेक्ष राज्य असेल असे घोषित करुन भारतीय समाजाला एक नवीन धर्मनिरपेक्ष लोकशाही जीवन पध्दती बहाल केली. भारतीय राज्यघटनेच्या उध्देश पत्रीके मध्ये आम्ही भारतीय सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक धर्मनिरपेक्ष गणराज्य निर्माण करण्याशी वचनबध्द आहोत. अशी घोषणा करुन भारतीय समजाच्या भावी राजकीय, सामाजीक, आर्थिक जीवननिष्ठा स्पष्ट केलेल्या आहेत.

धर्मनिरपेक्षतेचा विचार युरोपमध्ये विकसीत झाला. राज्यसंस्था, राजकीय व्यवहार आणि धर्म यांचे संबंध कसे असावेत हया विषयी विकसीत झालेला विचार मध्ययुगात राज्य संस्थेवर व राज्य संस्थेसी संबंधीत व्यवहारावर धर्माचा मोठा प्रभाव होता. मध्ययुगीन काळाच्या अंतापर्यंत धर्मयुध्दे झाली. तसेच धर्मसंस्था श्रेष्ठ की राज्यसंस्था श्रेष्ठ असा ही संघर्ष दिर्घकाळापर्यंत अस्तित्वात राहीला. या अनुषंगाने जो विचार विकसीत झाला तोच धर्मनिरपेक्षता म्हणून ओळखला गेला.- या विचारानुसार राज्यसंस्थेने कोणत्याही एका धर्मास खास दर्जा किंवा राज्य संस्थेला अधिकृत धर्म म्हणून दर्जा देऊ नये, धर्म व्यावहारीकतेच्या बाबतीत सर्व व्यक्तींना सारखीच वागणुक मिळावी, राज्यसंस्थेंच्या निर्णयामध्ये धर्मसंस्थेचा हस्तक्षेप होऊ नये असे मानले जाते. राज्य संस्थेने धर्माच्या क्षेत्रामध्ये हस्तक्षेप करु नये आणि धर्माने राजकीय क्षेंत्रात, राज्यसंस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये हस्तक्षेप करु नये असा मर्यादीत दृष्टीने धर्मनिरपेक्षतेचा अर्थ मांडला जातो.

धर्मनिरपेक्षतेच्या विचाराला तसे पाहाता ऐहिकवादाची बैठक आहे. धर्माला अभिप्रेत असलेल्या पारलौकिक जीवनाचा आणि राजकीय व्यवहाराचा संबंध असणे योग्य नाही. धर्म निरपेक्ष विचार परंपरेनुसार राज्य संस्थेला सर्व धर्म सारखेच असुन सर्व धर्माच्या नैतिक विचाराबाबत आदर बाळगणे.

भारतीय राज्यघटनेने प्रजासत्ताक लोकशाही धर्मनिरपेक्ष गणराज्याचा पुरस्कार करुन भारतीय समाजाला एका नव्या जीवनपध्दतीची ओळख करुन देऊन एका व्यापक जीवन सिंध्दांतावर भारतीय समाज निर्माण करण्याचे ध्येय बाळगले आहे. १९५० ते १९८० या कालखंडात भारतीय राजकारण धर्मनिरपेक्षतेचा विचार व जीवनपध्दती विकसीत करण्यांत कितपत यशस्वी ठरलेले आहे? याचा विचार होणे योग्य वाटते.

स्वातंत्र्योत्तर काळांत भारत हे एक सेक्युलर राज्य असेल या विषयी शंका नव्हती. स्वांतत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही संघ हिंदू-राष्ट्र व हिंदू राष्ट्रवादाचा पुरस्कार करीत असे असे राजकीय क्षेत्रांत हा मुद्दा विशेष गांभिर्याने घेतला जात असे. भारताचे आधूनिक लोकशाही राष्ट्र म्हणून राहावयाचे तर धर्मनिरपेक्ष हे आमच्या राजकीय व्यवस्थेचे अंग असले पाहिजे या हेतूने स्व.इंदिरा गांधीनी १९७६ मध्ये घटना दुरुस्त करुन घटनेच्या उद्देश पत्रिकेत च्धर्म निरपेक्ष राज्य हे उद्दिष्ठ समाविष्ट केले. इंदिरा गांधीच्या राजकीय धोरणाबध्दल हिंदुत्ववाद्याचा गट नेहमी साठी एक आरोप करीत होता. सरकार नेहमीसाठी अल्पसंख्यांकाना (मुसलमान)झुकते माप देते व त्यांचे अनुनय करते असा हा आरोप होता. तसे पाहता स्वातंत्र्यपूर्व काळांतही काँग्रेसच्या धोरणाबाबत हिंदुत्ववाद्यांचा गट काँग्रेसचे अल्पसंख्याकाच्या अनुनयाचे राजकारण असाच आरोप करीत होता. तसे पाहाता मुस्लीमांनी धर्माच्या आधारावर स्वतंत्र राष्ट्राची मागणी मान्य करुन पाकिस्तान पदरांत पाडून घेतले होते ही वस्तुस्थिती होती. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळातील जातीय/हिंदू-मुस्लीम दंगली, देशाची फाळणी, फाळणीच्या काळातील हिंसाचार या सर्व बाबी लक्षांत घेऊन धर्मनिरपेक्षता कसी आवश्यक आहे हे दिसून आले.

१९५० नंतर संघाचा एक राजकीय अवतार म्हणून जनसंघ हा अस्तित्वात आला. सांस्कृतिक राष्ट्रवाद, आक्रमक संरक्षण व परराष्ट्र धोरण, गो वध बंदीची मागणी या सारख्या धोरणात्मक चौकटीत जनसंघ वावरला या काळांतही मुस्लीम अनुनयाचे धोरण बंद केले जावे, अल्पसंख्याकांना वेगळया सवलती नसाव्यात, काश्मिर साठीची स्वतंत्र तरतूद कलम ३७० रद्द करावे या जनसंघाच्या मागण्या होत्या १९७५-१९७७ या आणिबाणीच्या काळांत काँग्रेस सरकारने रा.स्व.संघावर बंदी घातली. तसे पाहाता १९६७ पासून काँग्रेस विरोधात सर्वच विरोधी राजकीय पक्ष एक विरोधी आघाडी उभी करण्याचा प्रयत्न करीत होते. आणिबाणीमुळे सर्व विरोधी पक्षाच्या राजकीय स्वातंत्र्यावर बंधने पडली. त्यामुळे बिगर काँगेस पक्षाच्या ऐक्याला

गती मिळाली या सर्व राजकीय घडामोडीचा अविष्कार म्हणजे जनता पक्षाची स्थापना व सत्ताग्रहण अडीच वर्षाच्या कालावधीमध्ये जनता पक्षाचे तारु दुहेरी पक्ष सदस्यत्वाच्या प्रश्नावरुन फुटले. पूर्वाश्रमीचा जनसंघ, नव्या स्वरुपात भारतीय जनता पक्ष म्हणून अवतरला.

भारतीय राजकारणांत हिंदूत्ववादी गट एका वेगळया अंगाने राजकारण घडवु लागला. संघप्रणित राजकीय पक्ष भा.ज.प.ने मध्यम मार्गी भूमिका स्विकारुन संसदीय राजकारण करावे व केंद्रीय सत्ता हस्तगत करावी आणि संघपरिवाराने सांस्कृतिक क्षेत्रांत आक्रमक भुमिका स्विकारावी. त्या साठी विश्व हिंदू परिषद, बजरंगदल, अ.भा.वि.प. अशा विविध संघटनाच्या माध्यमाद्वारा सामाजिक जीवन हिंदू सांस्कृतिक वादाने भारावून टाकावी आणि प्रसंगानुसार आक्रमक जमातवादी भूमिका स्विकारावी. १९८५ नंतर रामजन्मभूमी आंदोलन सुरु झाले. प्रारंभी भा.ज.प. रामजन्मभूमी आंदोलनापासून दूर राहिला. भा.ज.प. नेत्यांनी वैयक्तीकरित्या अंदोलनांत भाग घेतला राम-जन्म भूमी आंदोलन हा भाजपच्या सांस्कृतिक स्वाभिमानाचा विषय होता. नंतर राम-जन्म भुमी प्रकरण भा.ज.प राजकीय कार्यक्रम ठरला संघ आणि भारतीय जनता पक्षाने राम-जन्मभुमी प्रश्न अग्रक्रमाने जनतेसमोर मांडून त्याला उग्र जमातवादाचे स्वरुप आणले. आम्ही परधर्माचा द्वेष करीत नाही असी व्यासपीठारुन ग्वाही देऊनही बाबरी मशीद पाडण्याचा कट संघ परिवाराने आखला. भारतीय जनता पक्षाने आम्ही भारतीय लोकशाही जीवन पध्दतीचा आदर करतो असे म्हणत जमातवादी भूमिका स्विकारल्याचे दिसते.

### सेक्युलरवाद्यांनी भा.ज.प.सी केलेले साटेलोटे :-

भारतीय जनता पक्षाच्या स्थापने वेळेस हा पूर्वीचा भारतीय जनसंघाचे नवस्वरूप आहे हे स्पष्ट झालेले होते. जनता पक्षाच्या १९७७-८० च्या कालखंडात समाजवाद्यांनी सातत्याने पुर्वाश्रमीच्या जनसंघीय सभासदावर द्विसदस्यत्वाच्या प्रश्नावरुन टिका केलेली होती. जनता पक्ष फुटल्यानंतर पुर्वाश्रमीच्या जनसंघीय गटाने भारतीय जनता पक्षाची निर्मिती करुन आपला हिंदूत्ववादी चेहरा वेगळया स्वरुपात व्यक्त केला. सुरुवातीला कांही दिवस भा.ज.प.ने गांधीवादी समाजवादाची घोषणा केली. परंतु लवकरच भा.ज.प.ने त्याला सोडचिठ्ठी दिली. हिंदूराष्ट्रवाद, काश्मिर प्रश्न, आयोध्या हे प्रश्न घेऊन १९८५ नंतर भा.ज.प.ने आपली दौड सुरु केली. आयोध्या प्रकरण वस्तुतः जमातवादी राजकारणाचा उघड-उघड पट आहे. भा.ज.प.चे जमातवादी राजकारण उघडपणे दिसत असतानाही सत्तेचा सोपान मिळविण्यासाठी वेगवेगळया राज्यांमध्ये स्वतःला निधर्मी म्हणणाऱ्या राजकीय पक्षानी भा.ज.प.सी. साटेलोटे केले. १९८९ नंतर अनुक्रमे मुलायमसिंह यांच्या विरोधांत उत्तर प्रदेशांत बहुजन समाज पार्टीने तर बिहार मध्ये लालू प्रसाद यांच्या विरोधात राजकारण करण्यासाठी समता पार्टीने भा.ज.प. चे बोट धरले. १९९८ नंतर अशाच प्रकारे प्रादेशिक पातळीवरील मर्यादीत राजकारणासाठी तृणमल कॉंग्रेस, बिजु जनता दल, लोकशाही, अ.द्रमुक, शिवसेना इत्यादीनी भाजपची गळाभेट घेतली. निवडणुकीनंतर आकडयाच्या चिखलात अडकलेला भाजपचा रथ अखेर तेलगू देसममुळे वर आला. या सर्वच बाबीचा विचार केल्यास तामीळनाडू मध्ये करुणानिधीनी भा.ज.प. ला साथ देणे किंवा उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटकातील वैचारिक बैठक नसलेल्या राजकारण्यांनी भा.ज.प. च्या दारांत हात पसरणे हया सर्व बाबी भा.ज.प. चे राजकारण यशस्वी करण्यांत विरोधी पक्षीयांनी बजावलेली भूमिका या जमातवादी नसलेल्या राजकीय पक्षांनी बजावलेली भूमिका भा.ज.प.सी हात मिळवणी कशी काय केली? राजकीय अपरिहार्यता आणि स्वतःचे आस्तित्व टिकवुन ठेवायची वृत्ती असे याचे उत्तर म्हणता येईल. परंतु याच कारणांमुळे भा.ज.प चा जमातवाद आधिक घट्ट झाला. तेलगू देसम, आ.द्रमूक, मुलायमसिंगाची समाजवादी पार्टी आणि इतर प्रांतातील प्रादेशिक पक्षाची राजकारण्यांची सैध्दांतिक बैठक आणि भौगोलिक व्याप्ती इतकी मर्यादित होती की, अखील भारतीय राजकारणातील स्वतःचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी त्यांना भा.ज.प. बरोबर जाणे आवश्यक होते.

लालकृष्ण आडवाणीची रथ यात्रा आणि कारसेवकांची बाबरी पाडतानाची झुंडशाही, विश्व हिंदू परिषदेच्या आक्रमक हिंदुत्ववाद आणि त्यांच्या नेत्यांनी तोगडीया आदिंनी केलेली वक्तव्ये भा.ज.प.चे मुळ स्वरुप दाखविण्याच्या घटना होत्या. परंतु भा.ज.प. सातत्याने मध्यममार्गी पक्ष म्हणुन स्वतःची ओळख जनमानसावर पसरविण्याचा प्रयत्न करत आलेला आहे. त्या साठी निवडणुकीच्या वेळी आक्रमक हिंदुत्वाचा प्रचार केलेला आहे. भा.ज.प. ने मित्र पक्षाबरोबर तडजोड करून एक समान कार्यक्रम तयार केला. त्यात वादग्रस्त मुद्यांना बाजुला ठेऊन एका समान कार्यक्रमावर तडजोड घडवुन आणलेली आहे. आम्ही आघाडीचे राजकारण करतो म्हणुन कांही बाबतीतले आमचे आग्रह बाजुला ठेवतो. अशी भा.ज.प.ची भुमिका आहे. बिगर जमातवादी मित्र पक्षाचा गोतावळा आणि किमान सहमतीचा कार्यक्रम या मुळे भा.ज.प.च्या मध्यम मार्गी भुमिकेला मान्यता मिळाली आहे. प्रत्यक्षात भा. ज. प.ने कोणत्याही बाबतीत आपली भुमिका बदललेली नाही. पण भा.ज.प. ने लवचिकता स्विकारून आपला कांही कार्यक्रम बाजुला ठेवलेला दिसतो.

आघाडीचे राजकारण आणि मध्यममार्गी दिखाऊ भुमिकेमुळे जमातवादाचे आकर्षण नसलेला मतदार वर्ग भा.ज.प.कडे आकर्षीत झाला. १९९१ च्या नंतर भा.ज.प.च्या मतसंख्येत आणि टक्केवारीत वाढ झाल्याचे दिसते. त्यामुळे राजकीय सत्ता हस्तगत करणे भा.ज.प. ला शक्य झाले.

भारतीय राजकारणात १९९० च्या नंतर धर्मनिरपेक्षता, धार्मिक उग्रता आणि त्यांच अनुषंगाने जमातवाद असा संघर्ष उद्‌भवल्याचे जाणवते. रथयात्रा, बाबरी प्रकरण या कारणामुळे भारतीय राजकारण ढवळुन निघाले. रथयात्रेने आणि त्यानंतर घडुन गेलेल्या बाबरी प्रकरणामुळे देशातील सर्व सेक्युलर पक्षापुढे भा.ज.प.ने मोठे आव्हान निर्माण केले हे राजकीय सत्य आहे. भा.ज.प. च्या या जमातवादी राजकारणाची उग्रता गुजरातमध्ये घडलेल्या गोध्रा हत्याकांडामधुन सर्वांना जाणवली. गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि त्यांच्या सहाकाऱ्यांनी शासकीय पातळीवरून घडवुन आणलेले हत्याकांड हे जगाने पाहिले आणि जर्मनीमधल्या नाझीवादाची आठवण करून दिली.

भा.ज.प.च्या जमातवादला इतर राजकीय पक्षांनी कसा प्रतिकार करायचा या संबंधीचा विचार राजकीय पातळीवर १९९६ पासुन होऊ लागला. धर्मनिरपेक्षतेच्या मुद्यावर १९९६ मध्ये संयुक्त आघाडीला काँग्रेसने पाठींबा दिला. १९९९ मध्ये भा.ज.प.चे सरकार पाडताना सर्व पक्षांची भूमिका जमातवादी भा.ज.प.ला हटविणे हीच होती.

### भा.ज.प. व रा.स्व.सेवक संघाचा सांस्कृतिक जहालवाद व जमातवाद :-

भारतीय राजकारणात आज भा.ज.प. क्रमांक एकचा पक्ष आहे. भारतीय जनता पक्ष जरी अवघा तीस वर्षाचा असला तरी त्याला प्रदिर्घ ऐतिहासीक परंपरा आहे. तसेच संघटना, राजकीय व्यवहार, धोरण या बाबत जनमानसात या पक्षाविषयी विशेष स्थान आहे. रा.स्व. संघ आणि भा.ज.प. यांचा संबंध अतुट असुन संघाचे राजकीय प्रतिनिधीत्व भा.ज.प. करतोय. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना गेली ८०-८५ वर्षे सातत्याने आस्तिवात असुन आपल्या विचाराचा मुळ गाभा कायम ठेऊन ती सतत विकसीत होत आलेली आहे. बदलत्या परिस्थितीशी सामना करण्याचे संघटनात्मक चातुर्य या संस्थेजवळ आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने स्वातंत्र्योत्तर काळात प्रत्यक्ष राजकीय व्यवहारात हस्तक्षेप करता यावा यासाठी भारतीय जनसंघावर भिस्त ठेवली. भारतीय जनसंघाने काही प्रमाणात निवडणुकात यश मिळवले. परंतु काँग्रेसच्या सर्वसमावेशक लोकशाही कल्याणकारी राज्याच्या कल्पनेला जनसंघ वैचारीक पातळीवर शह देऊ शकला नाही.१९७५ नंतर इंदीरा गांधीनी लोकशाही तत्वाची पाठराखण सोडल्यामुळे बिगर काँग्रेसी शक्तीच्या ध्रुवीकरणाला चालना मिळाली. आणिबाणीच्या काळात प्रथमच रा.स्व. संघाने चळवळीत भाग घेतला. संघ कार्यकर्ते लोकशाही रक्षणार्थ तुरूंगात गेले. या व्दारे बिगर काँग्रेसी शक्ती एकत्रीत येण्याच्या प्रक्रीयेला लोकशाही रक्षणाचे स्वरूप आले. स्वातंत्र्यपुर्व काळापासुन काँग्रेस विरोध हे संघाचे उद्दिष्ट राहीले. ही संधी १९७७ मध्ये आली १९७७ च्या जनता पक्षाच्या प्रयोगामुळे संघ आणि जनसंघाचा विस्तार होण्यास मदत मिळाली. संघ ही परिघस्थ शक्ती न राहता राजकारणाच्या मध्यवर्ती घटकांत तीचा समावेश झाला. १९८०-८४ या काळांत देशांतर्गत राजकीय परिस्थिती भा.ज.प ला आणि संघीय विचाराला अनुकूल होत गेली. काँग्रेस सत्तेवर राहीली पण तीचा संघटनात्मक कना मोडून पडला. सत्तेचा डोलारा सांभाळण्यासाठी खुद इंदिरा गांधींनी हिंदुत्वाच्या राजकारणाचा आधार बहुसंख्याक समाजात जमातवादी राजकारण करण्यास सुरुवात केली. हे राजकारण बळकट करावे म्हणुन रा.स्व.संघाने १९८४ मध्ये काँग्रेसला मदत करण्याचा पवित्रा घेतला. हिंदूत्वाचे राजकारण आयतेच प्रभावी होत असल्याचे रा.स्व.संघाने काँग्रेसी राजकारण्याला हातभार लावला.

या काळात संघाचा कार्यविस्तार अविरत चालू राहीला. केरळ, तामीळनाडू आणि आसाम या राज्यात संघाने आपला जम बसविला. याच काळात विश्व हिंदु परिषद सर्वत्र दिसू लागली. राम-जन्मभुमी आंदोलनाची जबाबदारी संघाने वि.हि.प वर सोपविली वि.हि.प.ने सर्वशक्तीनीशी हे आंदोलन उभे केले. संघ प्रणित भा.ज.प. चे राजकारण दिवसेंदिवस विस्तारत चालले आहे. आज भा.ज.प अत्यंत सुसज्ज आणि संपन्न पक्षसंघटना असणारा पक्ष आहे. अलीकडील काळांत भा.ज.प. ने स्वतःची पूर्वीची प्रतिमा बदलुन नवे रुप धारण करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. शहरी उच्च जातीयाचा पक्ष ही प्रतिमा पुसुन टाकून हिंदू मतदाराची व हिंदूमनाची आघाडी उभी करण्याचे भा.ज.प.ने ठरवलेले आहे. हिंदूत्वाचे भावनिक अवाहन आणि त्याच बरोबर विरोधी पक्षीयाचे विस्कळीत संघटन याचा दुहेरी फायदा घेत ग्रामीण भागात भाजप ने मागास जातीमध्ये शिरकाव केलेला आहे. प्रत्येकासाठी आपल्या पक्षाची द्वारे खुली ठेऊन येईल त्याला सामावून घेण्याची वृत्ती अंगीकारली आहे.

संघाचा आणि भा.ज.प. चा सांस्कृतीक जहालवाद आणि त्या संबधीचे राजकारण लक्षांत घेता, संघाने आणि संघ परिवाराने आपली सांस्कृतीक भुमिका बदललेली नाही. परधर्मिया विषयी असहिष्णूता, आणि प्रसंगी त्यांच्या बाबत हिंसक कार्यपध्दतीचा अवलंब हे संघाच्या मनोभुमिकेचे निर्देष आहेत. ख्रिश्चन पाद्री स्टेन्स आणि त्यांच्या मुलांची जिवंत जाळून बजरंग दलाने केलेली हत्या कशाचे निदर्शक आहेत? राम जन्मभुमि आंदोलन हे भा.ज.प चे व संघाचे पहिलेच आंदोलन त्यात रामभक्त, बैरागी यांच्या पासून छोटे व्यापारी, विद्यार्थी, नौकरदार व चळवळीचे आकर्षण असलेले तरूण इ.चा. भरणा होता. रामजन्मभुमी आंदोलनाच्या काळांत हिंदुत्व वाद्याचा विवेक हरवला होता हे म्हणणे चुकीचे ठरेल. जाणीवपूर्वक संघाने धार्मिक भावना चेतवुन हिंदूच्या मधील इतरधर्मीया बद्‌दलचा द्वेषाग्नी भडकविला. रामजन्मभुमी आंदोलनावर देशात सर्वत्रच हिंदूत्वाचा ज्वर वाढला.

भा.ज.प केवळ राजकीय पक्ष नाही, भारतीय समाजाचे विशिष्ठ आकलन गृहीत धरणाऱ्या आणि आपली समाज रचना कशी असावी याची निश्चित रुपरेखा असणाऱ्या व मुल्यात्मक चौकटी पुढे रेटणाऱ्या एका दिर्घसुत्री अशा संघटनात्मक व्यवस्थेचा एक भाग आहे. संघ आणि संघपरिवाराच्या आणि त्यांना अभिप्रेत असणाऱ्या हिंदूत्वाचा, हिंदू सांस्कृतिक वादाचा एकत्रित विचार करता एक बाब लक्षांत येते, ती म्हणजे भारतात आढळणारी बहूविधता हिंदू राष्ट्रवादाच्या संकल्पनेत आडथळा ठरण्याची शक्यता आहे. म्हणून सांस्कृतिक राष्ट्रवादाचा विचार संघ आणि परिवार मांडतात. आक्रमक हिंदूराष्ट्रवाद, हिंसेचे गौरवीकरण, परंपराचे प्रसंगानुसार कमी आधिक समर्थन, विपर्यस्त इतिहास, ख्रिश्चन आणि मुस्लीम धर्मीया विषयी दुरावा व असहिष्णुता, सर्व सामाजिक प्रश्नांची जमातवादी मांडणी, भांडवलशाहीचे समर्थन, एकछत्री सांस्कृतिक वर्चस्वाची कल्पना, दलिता विषयी व समाजामधील दरिद्री घटकांविषयी कृपावंताची भुमिका, उच्चजाती व उच्चवर्णीय व्यवस्थेचे अपार कौतुक असी वैशिष्ठे संघ आणि संघाशी संलग्न असणाऱ्या संस्थात आढळतात. संघाला आणि भा.ज.प. ला धर्मनिरपेक्षता आणि आजची राष्ट्रराज्याची संकल्पना मान्य नाही.

संघाला व भा.ज.प. ला अभिप्रेत असलेल्या सांस्कृतिक राष्ट्रवाद हिंदी भाषिक पट्टयातील वरीष्ठ हिंदू संस्कृतिसी संलग्न आहे. हिंदूराष्ट्र राज्य निर्माण करणे हे संघाचे आणि भा.ज.प.चे उद्दीष्ट आहे. परंतु वस्तुस्थिती असी आहे की अनेक प्रयत्न करुन ही हिंदू समाजाचे एकछत्रीकरण करणे संघाला व भा.ज.प ला साध्य झालेले नाही. साधु संताची आणि शंकराचार्याचे समर्थन मिळवुन देखिल एकछत्रीकरणाला गती मिळू शकलेली नाही. परंतु जमातवादी राजकारणाला गती देण्यांत संघ परिवार यशस्वी ठरला आहे.

संघाचा आणि भा.ज.प चा राजकीय हिन्दुत्ववाद या संदर्भात लक्षांत घेणे योग्य ठरेल. हिंदुत्ववादी गट नेहमीच धार्मिक उत्सवावर व कार्यक्रमावर भर देऊन आम्हीच हिंदु परंपराचे जतन करतो असा लोकांच्या मनांत विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. सतत हिंदू कार्यक्रमाद्वारे हिंदू जनसामान्यांना आपलेसे करण्यांत हिंदू राजकीय गट गुतलेले असतात. विश्व हिंदु परिषद, बजरंगदल, शिवसेना, रा.स्व.संघ हे धार्मिक उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे अन्य धर्मियाविषयी व्देष मुलक वातावरण तयार करतात. हिंदू जमातवाद हा हिंदूच्या एकछत्रीकरणावर आधारित आहे. हिंदु जमातवादाचे उद्दिष्ट हिंदु आत्मभानाला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्याचे आहे. महाराष्ट्रातील शिवसेना हिंदु आत्मभान पक्के करण्यास प्रत्यक्ष हातभार लावते. नेमके तेच काम जयललीताचा द्र.मु.क पक्ष तामीळनाडूत करतो आण्णा द्र.मु.क सरकारच्या काळांत हिंदू मतानी ही संघटना वाढली. विनायकी चतुर्थीच्या मिरवणुका तामीळनाडूतील शहरामधून निघु लागल्या आणि पध्दतशीरपणे हिंदु-मुस्लीम जमातीकरण घडले. ही वस्तुस्थिती लक्षांत घेता आण्णा द्रमुक भा.ज.पा चा तामिळ सरदार आहे मान्य करावे लागते.

एकछत्री हिंदु आत्मभान निर्माण केले जात असताना जी राजकीय प्रक्रीया घडते आहे तीचे स्वरुप फॅसिस्ट सदृश्य राजकारणाशी मिळते जुळते आहे. रा.स्व.संघ आणि त्याच्यातील संबंधीत अनेक संघटनाचे राजकारण हे फॅसिस्ट सदृश्य राजकारण आहे. भा.ज.प.ने सतत १९८५ पासून फॅसिस्ट सदृश्य राजकारण केले. एका नेत्यावर अतिरिक्त भर व श्रध्दा, त्या नेत्याची अवास्तव प्रतिमा निर्माण करणे, हिंसेला प्रोत्साहन मिळेल. असी भाषणबाजी, भावनोद्रेक घडवून आणणे लोकानुरंजनवादी राजकारण करणे इ. वैशिष्टये फॅसिस्ट सदृश्य राजकारणाला बळ देतात. महाराष्ट्रातील शिवसेना व तीचे राजकारण फॅसिस्ट सदृश्य राजकारण आहे.

१९८५ पासून भा.ज.पा.ने एक निष्ठावंत असा हिंदु मतदारसंघ घडविला आहे. पणतो संशय, द्वेष आणि स्पर्धात्क जमातवादाच्या आधारावर. संघ आणि भा.ज.प ने येथील विविध संस्थावर सांस्कृतिक केंद्रावर स्वतःचे प्रभुत्व निर्माण करुनही येथील एकछत्री हिंदुमनावर प्रभाव निर्माण करण्यांत यश मिळविले नाही. एकीकडे भारतीय लोकशाहीचा आणि धर्मनिरपेक्षतेचा निंदाजनक शब्दात अधिक्षेप करावयाचा आणि संघाला व भा.ज.प.ला अभिप्रेत असलेल्या लोकशाहीच्या व धर्मनिरपेक्षतेच्या वेगळया आशयाच्या संकल्पना मांडावयाच्या आणि सामान्याना दुर्धर करावयाचा ही संघाची व भा.ज.प ची रणनिती आहे. एकीकडे म.गांधीना प्रातःस्मरणिंय म्हणावयाचे आणि त्याच वेळेस वेगळया व्यासपिठावरुन गांधीची हत्या करणाऱ्या नथुराम गोडसेचे उदात्तीकरण करावयाचे. भा.ज.प व संघ परिवाराने सातत्याने हिंदु जमातवाद पुष्ठ करण्याचा प्रयत्न चालविला आहे जमातवादी राजकारणाचा अवलंब करुन सत्ता मिळविणे आणि त्यांना अपेक्षित असलेल्या हिंदु राष्ट्राचे स्वप्न साकार करावयाचे हे त्यांचा उद्देश आहे. संघ भा.ज.प म्हणजे अखिल भारतीय पातळीवरची सुसज्ज यंत्रणा जी सांस्कृतिक एकछत्रीकरण, जमावादी उन्माद, भावनिक राष्ट्रवादाचा पुरवठा करते. उच्च जाती, मध्यमवर्ग, आणि भारतीय भांडवलशाही यांची आपल्या देशांत राजकीय सांस्कृतिक युती आहे. युती पुढे आव्हाने उभी राहीली की जमातवादाला मोकळीक दिली जाते. भारतात जमातवादाच्या रुपाने फॅसिझम प्रकट होण्याची शक्यता आहे हे भारतीय लोकशाही समोरील फार मोठे आव्हान आहे.

## निष्कर्ष आणि समारोप

हिंदू धर्माचे आणि हिंदु समाजाचे व भारतीय समाजाचे आजचे वास्तव पाहिल्यास हिंदू संस्कृतीचा अनाठायी स्वाभिमान बाळगणा-या हिंदूत्ववादयांना आपल्या वैचारिक भूमिकेत बदल करणे आवश्यक आहे हे जाणवेल. आज भारतात हिंदु, शिख, जैन, बौध्द, मुसलमान, ख्रिश्चन या सर्वांचे सहअस्तित्व आहे. या सर्वांचाच स्वतंत्र धर्म असून, त्यांचे स्वतंत्र तत्वज्ञान आहे. स्वतःचे राजकीय अस्तित्व प्रगट करण्याची त्यांच्याकडे क्षमता आहे. या सर्व गोष्टींचे भान स्वातंत्र्यपुर्व काळातील राजकीय नेतृत्वाला होते म्हणूनच त्यांनी भारत हे एक राष्ट्र म्हणून या देशाला उभे करताना धर्मनिरपेक्ष लोकशाही तत्वज्ञानाची कास धरली. भारत हे एक स्वतंत्र, सार्वभौम लोकशाही गणराज्य म्हणून घोषित करुन सर्व जनसमुहाला लोकशाहीच्या विचारधाग्याने एकत्रित बांधण्याचे फार मोठे उदिष्ठ घटनाकारांनी व स्वातंत्र्यसेनानींनी साध्य केलेले आहे.

१९८० च्या दशकानंतर भारतीय राजकारणांत धार्मीकतेचा प्रभाव वाढत गेला. सार्वमताचे राजकारण साध्य करण्यासाठी आवश्यक असलेले वैचारिक क्षमता कॉग्रेसने गमावलेली होती. प. जवाहरलाल नेहरुंच्या नेतृत्वाखालील कॉग्रेस १९७५ नंतर केवळ सत्ता कारणाचे केंद्र व संघटना म्हणून अस्तित्वात राहिली होती. देशाच्या राजकारणात धर्मनिरपेक्षतेला अग्रगण्यता देण्याच्या दृष्टिने जे वैचारिक जागरण होणे गरजेचे होते ते राजकीय, सामाजिक विचारमंचावरुन मागे पडले होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आणि म. गांधीच्या हत्येनंतर हिंदुत्ववादयांची राजकारणात पिछेहाट झालेली होती. १९२५ च्या दरम्यान स्वा. सावरकर, डॉ. मुंजे, बाबाराव सावरकर, हेडगेवार, वगैरे हिंदुत्ववादी सक्रीय झाले. स्वातंत्र्य चळवळीतील पूर्वसुरीचे जे हिंदी राजकारण होते त्या पासून फारकत घेऊन हिंदु राष्ट्रवादाचा विचार स्विकारुन, या हिंदुत्ववादयांनी हिंदुसाठींचे, हिंदुत्ववादी राजकारणाची पायवाट धरली. स्वा. सावरकरांची हिंदू महासभा आणि डॉ. हेडगेवारांची राष्ट्रीय स्वयंसेवक संघटना या संघटना भारतीय राजकारणात कार्यरत झाल्या. स्वा. सावरकरांची १९३७ नंतर बिनशर्त सुटका झ ााली, तेव्हापासून हिंदु महासभेच्या राजकारणला वेग आला. स्वा. सावरकरांचा हिंदुत्ववाद हा पुरोगामी, विज्ञानानिष्ठ आणि पूर्णतः भौतिकवादी सिंध्दातावर विकसित झालेला आहे. स्वा. सावरकरांचा हा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन भारतातील सनातन्यांना न रुचणारा, त्यांच्या हितसंबंधाशी, त्यांची पुरोहितशाहीशी न जुळणारा आणि हितसंबंध सुरक्षित न ठेवणारा होता. डॉ. हेडगेवारांच्या मृत्युनंतर १९३९ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघटनेचे सरसंचालक म्हणून प. पुज्य गोळवळकर गुरुजींचा उदय झाला. १९३९ ते १९७३ पर्यन्त प. पुज्य गोळवळकरांच्या विचारधनांवरच संघ पोसला गेला, वाढला आणि फोफावला. संघ आणि संघपरिवालाला आणिबाणीनंतर भारतीय राजकारणातला वाढता प्रभाव आणि त्यांच्या हिंदुत्ववादी राजकारणामुळे भारताच्या निधर्मी राष्ट्रवादाला छेद देऊ पाहणारी आव्हाने ही चिंतनीय बाब ठरली. रामजन्मभूमी आंदोलन, बाबरीचा विध्वंस, गोध्रा हत्याकांड ही हिंदुत्ववादयांनी निर्माण केलेली आव्हाने आहेत. संघ आणि संघपरिवार पु. गोळवळकर गुरुजींच्या विचारपरंपरेनुसार विकसित झालेल्या संस्था आहेत. गुरुजींचे विचारधन हे वस्तुतः पारंपारिक वर्णीय श्रेष्टत्वाच्या आणि त्या वर्णीय व्यवस्थेला पुर्नजीवन देऊ पाहणारा विचारांचा संच आहे. या विचारांना बळकटी मिळवून देण्यासाठी समाजात धार्मीक उन्माद निर्माण करणे गरजेचे असते.

१९८० च्या दशकानंतर भारतीय राजकारणाचे स्वरुप धार्मिकतेचा रंग घेऊन एका वेगळया स्वरुपात अविष्कृत होत चाललेले आहे. भारताच्या राष्ट्रीय अस्मितेला, एकात्मतेला एक फार मोठे आव्हान धार्मिकतेच्या राजकारणाने उभे केले आहे. निधर्मी राष्ट्रवाद, निधर्मी, जातिविरहित राजकारण हा विचार भारतीय समाजजीवनात रुजने अत्यावश्यक आहे. जागतिक स्तरावर विकसित होऊ लागलेला विश्वबंधुत्ववाद हा मानवी अस्तित्वासाठी आणि सुरक्षिततेसाठी अनिवार्य ठरणारे मुल्य आहे. पाहिल्या प्रकरणात हिंदू धर्माचे विशुध्द स्वरूप स्पष्ट केलेले असून त्यांचे आजचे वास्तव रूपही प्रगट स्वरूपात अविस्कृत केले गेले आहे. हिंदूत्ववादाच्या उदयास भारतातील आजच्या धार्मिक वास्तवाचे आणि समस्यांचे स्वरूप कारणीभूत ठरलेले आहे. हे वरील चर्चेतून स्पष्ट झालेले आहे. पुढील प्रकरणात हिंदूत्ववादाशी संबंधीत राजकीय पक्ष व इतर संघटनाचा विचार मांडलेला असून त्यांची कार्यपध्दती व त्याचे परिणाम स्पष्ट केले गेले आहेत.

## संदर्भ ग्रंथ


३१ आंबेडकरांची हिंदुकरणाची चिकीत्सा. — बाबासाहेब आगादमी सातारा १९८९

३२ मौज दिवाळी अंक — १९७४.

३३ वैज्ञानिक दृष्टीकोनातून रा. स्व. संघ — रा. ह. तुपकरी पृ. ३५.

३४ वैज्ञानिक दृष्टीकोनातून रा. स्व. संघ — रा. ह. तुपकरी पृ. ३५.

३५ वैज्ञानिक दृष्टीकोनातून रा. स्व. संघ — रा. ह. तुपकरी पृ. ३५/३६.

३६ वैज्ञानिक दृष्टीकोनातून रा. स्व. संघ — रा. ह. तुपकरी पृ. ३५/३६.

३७ वैज्ञानिक दृष्टीकोनातून रा. स्व. संघ — रा. ह. तुपकरी पृ. ३६/३७.

| | | |
|---|---|---|
| **३८** | वैज्ञानिक दृष्टीकोनातून रा. स्व. संघ | रा. ह. तुपकरी पृ. ३८/३९. |
| **३९** | रावसाहेब कसबे स्त्रोत | सुगावा प्रकाशन, पुणे ९७ (०१ मे १९७८)पृ.०७ |
| **४०** | शिवराञ | नरहर कुरूंदकर -पृ. ३७ - ५६. |